रविवार, दि. १२ जानेवारी २०२५

# चंद्रपूर महासागर

पान ३

## वरोरा तालुक्यात रेती तस्करांना आर्शिवाद

**महासागर प्रतिनिधी**

**वरोरा दि. ११ जानेवारी :** वरोरा तालुक्यात सर्वत्र नदी घाटावर , नाल्यावर रेती तस्करांकडून अवैध रेतीची उचल वाहतूक रोजरासपने रात्रंदिवस सुरू आहे. या रेती तस्करांवर वनविभागाच्या अधिकाऱ्यांचे, महसूल विभागाचे तहसीलदार, नायब तहसीलदार, तलाठी, पोलीस प्रशासन यांच्याकडून कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याने प्रशासनाचे अधिकारी मौनी बाबा झाल्याचे दिसत आहे. तालुक्यापासून सहा ते सात कि.मी. अंतर असलेल्या करंजी या गावातुन वाहणाऱ्या वर्धा नदीच्या पात्रात लाखो ब्रास रेती साचलेली आहे या साचलेल्या रेतीवर लाखो रुपयाचा महसूल हे रेती तस्कर लूटत आहे.

## कोषागार कार्यालयात निवृत्तीधारकांचा मेळावा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ११ जानेवारी :** मीनाताई माध्यमिक विद्यालय नवखळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आले. दिनांक ३० डिसेंबर रोजी क्रिडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. ३१ डिसेंबरला तालुकास्तरीय नावीन्यपूर्ण नवरत्न स्पर्धा विद्यालयामध्ये आयोजीत करण्यात आल्या. या स्पर्धेकरीता स्नेहल लाड तसेच नागभिड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी पालवे , विस्तार अधिकारी भंडारे मॅडम तसेच नागभिड पंचायत समितीचे सर्व केंद्रप्रमुख , विस्तार अधिकारी तसेच १० केंद्रांतून आलेले प्रथम क्रमांकाचे नवरत्न व त्यांचे मार्गदर्शक शिक्षक शिक्षिका उपस्थित होते.

# कापूस केंद्रावर शेतकऱ्यांची लूट

## कारवाई करण्याची डॉ. अंकूश आगलावे यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ जानेवारी :** वरोरा येथील स्वामी कॉटन कापूस खरेदी केंद्रावर कास्तकार बांधवांची आर्थिक लुट होत असल्या प्रकरणी डॉ. अंकुश आगलावे, ओबीसी ग्रामीण जिल्हाध्यक्ष भाजपा वरोरा यांनी नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र देवून कळविले आहे.

जिल्हयातील वरोरा शहरा लगत वनोजा मार्डा रोडवर स्वामी कॉटन जीन नावाने खरेदी केंद्र असून तेथे वरोरा तालुक्यातील शेतकरी आपला उत्पादीत केलेला कापूस विक्री करण्याकरीता आणतात. स्वामी कॉटन जीन हे सी.सी.आय.मार्फत शेतक-यांचा कापून ग्रेडींग नुसार जागेवरच खरेदी करतात.

स्वामी कॉटन जीनिंग मध्ये जेव्हा शेतकरी कापूस विकायला आणतात तेव्हा जीनिंग व्यवस्थापन विक्रीस आणलेल्या कापूसाचा चुकीचा ग्रेडींग करून जास्त मोईच्यर असल्याचे भासवून शेतक-यांचा कापूस कमी भावात खरेदी करीत आहे. दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८.०० वाजताच्या सुमारास काही कास्तकार व प्रफुल पंढरी चवले यांनी कापूसाचे कमी ग्रेडिंग का करीत आहे असा सवाल विचारल्यास त्यांना जीनिंगचे मालक, कर्मचारी व ग्रेडर यांनी मारहाण केली. तसेच मारहाण प्रकरणाचे सत्य बाहेर येवू नये म्हणून जीनिंग परिसरातील सी.सी.टी.व्ही कॅमेरे देखिल व्यवस्थापनाने बंद करून ठेवले.

स्वामी कॉटनचे कर्मचारी,व्यवस्थापक व मालक हे कापूसाचे ग्रेडेशन ८ असतांना देखिल ते ग्रेडेशन ११ दाखवून कापूसाला कमी भाव देत आहे. यामुळे शेतक-यांचे अतोनात आर्थिक नुकसान होत आहे.

तसेच कापुस विकल्याची पावती देखील देत नसल्याचे अनेक तक्रारी आहे. शेतकरी देशाचा पोशिंदा आहे. कबाड कष्टाने घाम गाळून उत्पादीत केलेला कापूसाला कमी भाव देवून कास्तकार बांधवाची आर्थिक लुट करीत आहे . कापूसाला योग्य ग्रेडेशन देवून योग्य भाव मिळण्याची मागणी डॉ. अंकुश आगलावे, नरेंद्र जिवतोडे यांनी केली आहे.

# शिर्डी महा अधिवेशनासाठी भाजपाचे शेकडो कार्यकर्ते शिर्डीकडे रवाना

**महासागर प्रतिनिधी**



**चंद्रपूर, दि. ११ जानेवारी :** शिर्डी येथे भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र महाअधिवेशन होणार असून, आमदार किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वाखाली चंद्रपूरमधील भारतीय जनता पक्षाचे शेकडो कार्यकर्ते शिर्डीकडे रवाना झाले आहेत. या प्रवासासाठी पाच बस आणि चारचाकी वाहने यांचा वापर करण्यात आला असून, सर्व कार्यकर्ते शिर्डीत दाखल होणार आहेत.

रविवारी आयोजित करण्यात आलेल्या या महाअधिवेशनात भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. चंद्रपूरमधील कार्यकर्त्यांनी प्रचंड ऊर्जा, राष्ट्रसेवेची बांधिलकी आणि दृढ संकल्पाने या प्रवासाला सुरुवात केली आहे. या प्रवासात महिला, पुरुष, युवा, तसेच वरिष्ठ कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे. शिस्तबद्ध संघटन, देशसेवा, आणि एकात्मतेच्या भावनेने प्रेरित हे कार्यकर्ते शिर्डीकडे मार्गक्रमण करत आहेत.महाअधिवेशनात पक्षाच्या धोरणांचा आढावा घेऊन आगामी दिशा ठरवली जाणार आहे. यामध्ये कार्यकर्त्यांसाठी संघटनात्मक बळकटीवर मार्गदर्शन, आगामी निवडणुकांसाठी रणनीती ठरवणे, तसेच जनतेपर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवण्यासाठी नव्या उपक्रमांची चर्चा होणार आहे.

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ११ जानेवारी :** वाढते अपघाताचे प्रमाण लक्षात घेता येणाऱ्या काळात होणाऱ्या अपघातावर नियंत्रण ठेवण्यासाठी अपघात होऊच नये यासाठी वाहक, चालक तसेच प्रवाशी यांच्यात जाणीव जागृती निर्माण होण्याकरिता तसेच वाहन चालकांनी घ्यावयाची काळजी नियमाचे काटेकोर पालन व्हावे स्वतःची आणि इतरांची सुरक्षा कशी करता येईल यासाठी ११ जानेवारीला राष्ट्रीय रस्ता सुरक्षा दिनानिमित्त आयोजित राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे उद्घाटन सोहळा ब्रम्हपुरी आगारात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाचे उद्घाटन ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्या हस्ते द्रीप प्रजलन करून करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून सामाजिक कार्यकर्ता तथा पत्रकार प्रशांत डांगे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून आगार व्यवस्थापक जयकुमार इंगोले, चंदनकर साहेब,वाहतूक निरीक्षक पांडव , लेखाकार फाये, प्रभाकर वासनिक प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयकुमार इंगोले यांनी केले तर सूत्रसंचालन वामन नागोसे तर आभार प्रदर्शन बोरकर यांत्रिक यांनी केले. सदर कार्यक्रमांमध्ये चालक वाहकांना सुरक्षित चालकांना सुरक्षित वाहन चालवण्याबाबत मान्यवरांकडून मार्गदर्शन करण्यात आले .कार्यक्रमास ब्रम्हपुरी आगारातील वाहक ,चालक तसेच यांत्रिक ,मेकॅनिक आदी कर्मचारी उपस्थित होते.

# कोरपणा तालुक्यात खाजगी शाळां कडून पालकांची वारेमाप लूट

**महासागर प्रतिनिधी**

**कोरपना, दि. ११ जानेवारी :** जिल्ह्यातील शेवटच्या टोकावर असलेल्या कोरपणा तालुक्यात मोठ्या प्रमाणात खाजगी शाळा उद्यास आल्या आहेत शिक्षण विभागाचे याकडे अक्षम दुर्लक्ष होत असल्याने मनमानी पद्धतीने शुल्क आकारून पालकांची लूट सुरु आहेत खाजगी शाळेवर कुणाचेही अंकुश राहिले नसल्यामुळे या शाळांनी आपली दुकानदारी सुरु केली आहेत शालेय साहित्य, वह्या, पुस्तके,गणवेश, बूट,ट्युशन,प्रवास भाडे,यासह इत्तर विविध प्रकारचे शुल्क आकारून पालकांची वारेमाप लूट सुरु आहेत

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्याचा पालकांचा कल असला तरी सिबिएसई व स्टेट बोर्डाच्या शाळांच्या शुल्कचा आकडा एकूणच पालकांच्या मनात धडकी भरत आहे.

गेल्या काही वर्षात कोरपना तालुक्यात खाजगी शाळेचा हब बनत असल्याने सिबिसई सह स्टेट बोर्डाच्या नवीन शाळा सुरु झाल्या आहे घरापासून जवळच्या शाळांना पालक प्राधान्य देतात. मात्र दर्जेदार शिक्षणाच्या नावाखाली खाजगी शाळानी लाखो रुपयाची वसुली करून शिक्षणाचा बाजार मांडला आहे

तालुक्यातील काही शाळांच्या नर्सरी,केजी, पहिली,आणि त्यापुढील इयतेच्या शुल्कचा आकडा पालकांचा ताण वाढवीणारा आहेत

एकीकडे जिल्हा परिषदेच्या शाळांना सोयीसुविधा दिल्या जात नसल्याने खालवलेला शैक्षणिक दर्जा तर दुसरीकडे खाजगी शाळांचा शुल्क अव्वा च्या सव्वा यामुळे तालुक्यातील पालकांची कोंडी झाली आहे राज्य सरकाने खाजगी शाळांना शुल्कची मर्यादा ठरवून द्यावी अतिरिक्त शुल्क आकरणाऱ्यांना दंडासह कारावसाची तरतूद करून या धोरणाची अंमलबजावणी करावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहेत

दरवर्षी शाळेच्या शुल्कांमध्ये वाढ होत आहे पहिली ते दहावी पर्यंतच्या शाळेच्या दरपत्रकाचा आराखडाच पालकांना दिला जातो सीबीएसई, स्टेट बोर्डाच्या शाळांच्या शुल्कांवर सरकारचे नियंत्रण नाही शिक्षण विभागाकडूही कारवाई होत नसल्याने वेळेवर शुल्क न दिल्यास निकाल थांबवणे किव्हा शाळेत बसू दिल्या जात नसल्याची ओरड पालक वर्गातून होत असून यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे

वहया, रजिस्टर, बुक, बूट, गणवेश, व बॅग सुद्धा एक एजेंट नेमून अमक्या दुकानातून शालेय साहित्य खरेदी कराच्या सूचना पालकांना काही खाजगी शाळेकडून दिल्या जात असल्याने याचे काही लागे बांधे असल्याची शंका पालकांतून व्यक्त होत आहेत.

# धानाची मळणी करताना क्रेशर पेटून धानाच्या ढिगाला लागली आग

## लाखो रुपयांचे नुकसान, विठ्ठलवाडा शेतशिवारातील घटना

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**गोंडपिपरी, दि. ११ जानेवारी :** खरीप हंगामात धानाची रोवणी केली.पीक जोमदार आले. धान कापणी करून मळनीसाठी ढीग रचला. मळणी करीत असतानाच अचानक मळणी यंत्राला आग लागली यात ट्रॅक्टर जळली.सोबतच धानाच्या ढीगाला आग लागल्याने आगीत धानाचा संपूर्ण ढीग जळून राख झाला.तर अन्य एक ढीग अर्धवट जळाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची घटना दि. ११ रोजी दुपारी दोन वाजताचां सुमारास विठ्ठलवाडा शेत शिवारात घडली आहे.



विठ्ठलवाडा- येंनबोथला मार्गावर शंकर पिंपळकर आणि वासुदेव पिंपळकर यांची शेती असून खरीप हंगामात त्यांनी आपल्या चार ते पाच एकर शेतात धानाची लागवड केली. धानाची कापणी करून मळनिसाठी शेतातच धांनाचा ढीग रचला.

वडिल वासुदेव पिंपळकर यांनी देखील आपल्या शेतीतील धान कापून शंकर यांच्या धानाच्या ढीगालगत आपलाही धानाचा ढीग रचला. आज दुपारला मळणी यंत्र शेतात दाखल झाले. आणि धांनमळनी सुरू झाली दरम्यान अचानक मळणी यंत्राणी पेट घेतला बघता बघता धानाचा ढीगाला आग लागल्याने शंकर पिंपळकर यांचा मालकीचा धानाचा ढीग पूर्णतः जळून राख झाला. तर वासुदेव पिंपळकर यांचा धानाचा ढीग अर्धवट जळाल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

### पीक वाचविण्यासाठी शेतकऱ्याची धावाधाव

धानाच्या ढीगाला आग लागल्याची माहिती गावकऱ्यांना होताच गावकर्यांनी विठ्ठलवाडा - येंनबोथला मार्गावरील शंकर वासुदेव पिंपळकर यांच्या शेतशिवारात प्रचंड गर्दी उसळली. जो तो शेतातच विहिर असल्याने आग विजविण्याकरिता पाईप जोडण्याचे कामी लागला. तो पर्यंत धनाचा एक ढीग जळून राख झाला. दुसऱ्या ढीग अर्धवट जळत असताना पाईप द्वारे पाणी टाकून आग विझविण्याचा प्रयत्न केला. दरम्यान दुसरा धानाचा ढीगाला आग लागून अर्धवट ढीग जळत असताना पाईप द्वारे पाणी टाकून आग विझविण्यात आली . अवघ्या काही तासात हाती येणारे धान पीक शेतकऱ्याच्या डोळयादेखत जळून राख झाल्याने शेतकऱ्याच्या नयनी अश्रू तरळले....!

# गोंडवाना विद्यापीठात 'पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र

## गुरुदास कामडी यांचा प्रस्ताव अधिसभेत मंजूर

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ जानेवारी :** गोंडवाना विद्यापीठात गडचिरोली अधिसभा (सिनेट) २४ डिसेंबर २०२४ व दिनांक ८ जानेवारी २०२५ रोजी संपन्न झाली. या अधिसभेत बाब क्रं. अधिसभा सदस्यांनी सादर केलेले प्रस्तावावर चर्चा करण्यात आली.

अधिसभा तथा व्यवस्थापन परिषद सदस्य गुरदास कामडी यांनी ,'पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर - महिला सक्षमीकरण व सुरक्षा' अध्यासन करण्याचा प्रस्ताव अधिसभेत मांडला . या प्रस्तावाला डॉ. संजय गोरे,प्रशांत दोंतुलवार, संजय रामगिरवार,प्रा.धर्मेंद्र मुनघाटे यांनी अनुमोदन दिले.

ज्या मनगटात बळ, बुद्धी आणि चातुर्य आहे, तोच स्वकर्तुत्वावर लोकाभिमुख राजा बनू शकतो असा संदेश देणाऱ्या व ज्यांच्या कृतिशील कार्याचा उल्लेख भारताच्या इतिहासात सोनेरी अक्षराने केला जातो अशा लोकमाता अहिल्याबाई होळकर. सर्वधर्मसमभाव ,अस्पृश्यता उच्चाटन ,सामाजिक एकात्मता, स्त्री पुरुष समानता, गोरगरिबांना विषयी कळवळा, हुंडा पद्धतीचे उच्चाटन, अनिष्ट चालीरीती रूढी परंपरांचा बिमोड, मूल दत्तक वारसाहक्क ,प्रजेविषयी तळमळ अशा कितीतरी समाजसुधारकांचे कृतिशील कार्य करणाऱ्या लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशती जन्मशताब्दी देशभर साजरी केली जात आहे. याच पर्वावर हे अध्यासन केंद्र सुरु करण्याचा प्रस्ताव गुरुदास कामडी यांनी गोंडवाना विद्यापीठाच्या अधिसभेत सादर केला.

अहल्यादेवीने प्रजेच्या हितासाठी जगण्याचा निर्णय घेतला .धर्म ,रूढी ,परंपरा यापलीकडे कर्तव्य महत्त्वाचे माणून रयतेला कल्याणकारी राज्य दिले. सुखी,समाधानी आणि संपन्न बनवण्यासाठी स्वतःच्या दुःखाचा विचार न करता अहल्यादेवींनी धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता ,समता व न्याय या तत्त्वाप्रमाणे राज्य केले.

# महसूल विभाग सुस्त, रेती माफिया व्यस्त का रोज रात्री धावते पिकअप् व ट्रॅक्टर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ११ जानेवारी :** तालुक्यातील बोनाथाळा, पिपरी, कोच्ची, गुंजाळा, कचराळा, चपराळा, चंदनखेडा येथील रेती घाटातून अवैध रेती उत्खनन करण्यासाठी कदाचित एकाच रेती माफियाला परवानगी दिली आहे. त्यामुळे त्याची पिकअप् आणि ट्रॅक्टर रोज रात्री २ च्या सुमारास आपल्या साथीदारसह काळोख्या अंधाराचा फायदा घेत वाहतूक करीत आहे, हा नेमका कोण ? याला शासकीय परवानगी आहे काय? की कोणत्या अधिकाऱ्याचा आशीर्वाद लाभलेला आहे, असा प्रश्न उदभवत असून महसूल विभागाच्या होणाऱ्या थातुरमातुर् कारवाई वर् प्रश्न चिन्ह निर्माण करण्यासारखे आहे.



कोंढा फाट्याच्या शेत शिवारातील रस्त्याने रात्री २ च्या सुमारास अवैध रेती ची वाहतूक ही मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यात महसूल विभागाचा महसूल बुडवित काही अधिकाऱ्याशी आर्थिक संबंध ठेवून रेती उपसा करण्याचे चित्र आहे.

जेव्हा ए सी चा थंड हवेत बसून, देवाच्या गाभाऱ्यात बसलेला भू माफिया कडून आमचा तालुक्याचा बॉस एकच आहे,दुसऱ्याचा आदेश मान्य नाही, अशी उत्तर येतो, तेव्हा याचे प्रतिउत्तर महसूल विभाग की पोलिस प्रशासन देईल हे पाहणे तितकेच खरे. तालुक्यात शासकीय यंत्रनेचा दबाव हा भू माफिया वर् होत नसल्याचे चित्र येथे पहावयास मिडत आहे.

भद्रावती तालुक्यात सध्या रायपुर, मध्य प्रदेश येथील रॉयल्टी ची रेती येत असून तिचा निपटारा शहरात जास्त भावात विक्री केल्याने खरेदीदारात मोठी कुजबुज केल्या जात आहे.

# नागभीड तालुक्यातील पारडी (ठवरे ) येथे वाघाच्या हल्ल्यात शेतकरी जखमी

## वाघाचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाची चमू सज्ज

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ११ जानेवारी :** चंद्रपूर जिल्हा हा वाघाचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असून वाघाची संख्या वाढल्याने स्वतःची भूक भागाविण्यासाठी वाघानी ताडोबा अभ्यायरन्य सोडून जिथे जंगल असेल तिथे वाघाने आश्रय घेत जी सोपी शिकार आहे त्यावर आता वाघाने मोर्चा फिरवीला असे दिसून येत आहे. नागभीड तालुक्यातील वासाळा (मक्त )येथे दोन वाघाची झुंज झाली तेव्हा एक वाघ जखमी झाला असल्याचे वन विभागाकडून सांगण्यात आले. पण दिनांक १० जानेवारी रोजी पारडी ( ठवरे ) शेतकरी गुरुदेव दादाजी सारये हे दुपारी शेतातून घरी परत येत असताना दबा धरून बसलेल्या वाघाने हल्ला केला. यावेळी सोबतीला असलेल्या एकावर वाघाने हल्ला चढावताच आरडा, ओरड करताच दुसऱ्याने दगड मारताच वाघ पळून गेला पण हल्ला कारणाऱ्यावर झडप मारल्याने जखमी केले त्याला ब्रम्हपुरी येथील खाजगी रुग्णालयात भरती करण्यात आले आहे. वन विभागाचे वतीने वाघाचा शोध वन विभागाची चमू पाळत ठेऊन वाघाला पकडण्याचे प्रयत्न केले जात असल्याचेसहाय्यक वन सार संरक्षक डॉ महेश गायकवाड यांनी सांगितले. नागभीड तालुक्यात वाघाचा वावर असल्याने शेतकरी यांना शेतात जाण्याकरिता भीती निर्माण झाली असून अनेक पिके वन्य प्राणी नासाडी करीत आहेत. मानव व वन्य प्राणी हा संघर्ष नवीन राहिला नाही असे दिसून येत आहे.

# परभणी येथील हत्येच्या तसेच गृहमंत्री शहा यांच्या वक्ताव्याचा निषेध करीत आक्रोश मोर्चा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. ११ जानेवारी :** महाराष्ट्रात अनेक ठिकाणी हत्येचे सत्र सुरु असून देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वारमवर शब्द वापरून अपमाणित केले याचा निषेध करण्यासाठी आक्रोश मोर्चा १०जानेवारी रोजी बौध्द विहार येथून काढून तहसील कार्यालय येथे नेण्यात आला.




महाराष्ट्रात परभणी येथे सोमनाथ सूर्यवंशी ह्या दलित तरुणाला नाहक कारण सांगून त्याला पोलिसांनी मारल्याचा आरोप करीत ठार मारले आहे. याचा निषेध करण्यासाठी विविध मागण्या घेऊन विविध संघटना एकत्र येत मोर्चाचे निवेदन तहसीलदार प्रताप वाघमारे यांना देण्यात आले. यावेळी खा नामदेव किरसान उपस्थित होते यावेळी त्यांनी उपस्थित मोर्चाला संबोधित करून देशातील सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत आहे यासाठी आपण नेहमी यासाठी आपण जागरूक व सज्ज असणे गरजेचे आहे. मी तुमचा सेवक या नात्याने हा आवाज उठविणार आहे. पोलिसांनी केलेली हत्या हे देशासाठी कलंक आहे. देशाचा कारभार हा घटनेनुसार चालावावा असे असले तरी आम्हीच घटनेचे रखवालदार असल्याचे कथित सरकार भासावत आहे. गृहमंत्री अमित शहा हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नांव घेऊन त्यांना परमेश्वर पावत असेल तर त्यांनी जप करावा असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अनु जाती, जमाती आणि बहुजन मोर्चात उपस्थित राहून न्याय मिळेपर्यंत मोर्चाचे वतीने निवेदन देण्यात आले.

# वृत्तपत्र म्हणजे अन्यायाला वाचा फोडण्याचे प्रभावी माध्यम लोकशाहीचा चौथा स्तंभ : तहसीलदार संदीप पानमंद

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सिंदेवाही दि. ११ जानेवारी :** निर्भीडपणे आपल्या लेखणीतून लोकशाहीला वाचविण्यासाठी सामाजिक व राजकीय क्षेत्रात चालणाऱ्या प्रत्येक घडामोडीवर लक्ष देउन कोणावरही अन्याय होऊ नये याकरिता पत्रकार बांधव हा नेहमी सत्याची बाजू नेहमी प्रभावी पणे मांडण्याचे काम करीत असतो कधी कधी त्यांचेवर खूप दबाव पण असतो परंतु कोणत्याही आव्हानाला सामोर जावून समर्थपणे लढा देने अन्यायाला वाचा फोडण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वृत्तपत्र लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचे प्रतिपादन तहसीलदार संदीप पानमंद यांनी केले.



ते प्रेस क्लब सिंदेवाही च्या वतीने आयोजित पत्रकार दिनाच्या मंचावरून बोलत होते सर्व प्रथम मराठी वृत्तपत्राचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे मान्यवर मंडळींच्या हस्ते पूजन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार तथा प्रेस क्लब चे मार्गदर्शक बाबुरावजी परसावार तर प्रमुख पाहुणे तहसीलदार संदीप पानमंद वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सालकर ,उपअभियंता शटगोपनवार माजी जी प सदस्य रमाकांत लोधे कार्यक्रमाचे प्रायोजक आणि निराधार निराश्रित लोकसेवा प्रकल्पाचे संस्थापक नगरसेवक युनूस शेख उपस्थित होते यावेळी सिंदेवाही तालुक्यातील ज्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली अश्या काही निवडक मान्यवर मंडळींचा सत्कार करण्यात आला यात सामाजिक व राजकिय क्षेत्रातुन आशिष चिंतलवार,कला क्षेत्रातील अनिल उट्टलवार,प्रगतशील शेतकरी म्हणून पांढरवाणी येथील गुरुदास मसराम ,लघु व्यवसायी प्रकाश पसपुनवार, नामांकित हॉटेल व्यावसायिक सागर बिसेन,महिला उधोजक सौ मंगला चेपूरवार, वैद्यकीय क्षेत्र डॉ विनय बंडावार, शिक्षण क्षेत्र भार्गवी बोरकर, आदिवासी क्षेत्रातून वैष्णवी जुम्मनाके, यांच्या सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन जितेंद्र बेलोरकर, आभार सुधाकर गजभीये यांनी केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अमृत दंडवते, राकेश बोरकुंडवार, खालिद पठाण, शरद नैताम, अनिल एलकेवार, प्रशांत गेडाम आदिंनी सहकार्य केले.

## चिमूर येथे सहज योग भजन भक्ती संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ११ जानेवारी :** सहजयोग ध्यान साधना केंद्र चिमुरच्या वतीने दि १२ जानेवारी २०२५ रोजी रविवारला सकाळी ११ वाजता शेतकरी भवन मेन रोड हजारे पेट्रोल पंप समोर चिमुर येथे तालुका स्तरीय सहज प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून सहज भजन भक्ती संगीताचा कार्यक्रम घेण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे गायक म्हणून डॉ संदीपजी दलाल अमरावती व मिलिंदजी दलाल पुणे यांचा संपूर्ण संच राहणार आहे . या कार्यक्रमाकरीता प्रत्येक सहज योगी बंधू आणि भगिनींनी श्री माताजींना नवीन वर्षाची भेट म्हणून नवीन पाच साधक घेऊन यावे तसेच सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहुन कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रवीण साटोने तालुका समीती समन्वयक चिमुर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून केले आहे.

## वाघाच्या दहशतीने शेतमजूर भयभीत

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ११ जानेवारी :** तालुक्यातील गोवरी- अंतरगाव- गोयेगाव शेतशिवारात कापूस वेचणी करायला गेलेल्या महिलांना अचानक शेतात वाघ दिसल्याने घाबरलेल्या महिला व शेतकऱ्यांनी कापूस वेचनीचे काम तातडीने बंद केले.त्यामुळे शेतकरी व नागरिकांत दहशत निर्माण झाली असून वाघ दिसल्याने शेतीची कामे प्रभावित झाली आहे. राजुरा तालुक्यातील गोवरी येथील शेतकरी बाळकृष्ण नामदेव काळे यांची अंतरगाव शेतशिवारात शेती आहे.या शेतीला तीन गावाची सीमा लागून आहे. सध्या मजूर मिळत नसल्याने शेतात कापूस फुटून आहे.त्यामुळे बाळकृष्ण काळे यांच्या शेतात महिला सकाळी कापूस वेचणी करायला गेल्या होत्या.

# अमली पदार्थ विक्रीची पायमुळे शोधत कायमचा बंदोबस्त करा - आ. किशोर जोरगेवार

## पोलिस अधीक्षकांना सूचना, मृतक तन्मय खान यांच्या कुटुंबीयांची घेतली भेट

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ जानेवारी :** नशेत असलेल्या चार युवकांनी तन्मय खान यांची हत्या केली. हे सर्व युवक अल्पवयीन आहेत. त्यांच्या हातात अमली पदार्थ कसे पोहोचले, असा प्रश्न उपस्थित करत, अमली पदार्थ विक्रीची पायमुळे शोधून काढत विक्रेत्यांचा कायमचा बंदोबस्त करा, अशा सूचना आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांना दिल्या आहेत.



चार युवकांनी मिळून बाबूपेठ येथील रहिवासी तन्मय खान यांची हत्या केल्याची घटना गौतम नगर परिसरात घडली होती.

सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र, आरोपी नशेत असल्याचे उघड झाल्याने गांजा, ड्रग्जसारख्या अमली पदार्थांच्या विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, आमदार किशोर जोरगेवार यांनी तन्मय खान यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून, शांतप्रिय चंद्रपूर जिल्ह्यासाठी अशा घटना अत्यंत घातक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आमदारांनी शहर पोलिस ठाण्याच्या ठाणेदार प्रभावती एकरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून बाबूपेठ परिसरात पोलिस गस्त वाढवण्याचे निर्देश दिले.तसेच, अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

जिल्हा पोलिस अधीक्षक सुदर्शन मुमक्का यांच्याशीही त्यांनी दूरध्वनीवरून संपर्क साधून अमली पदार्थ विक्रीबाबत चिंता व्यक्त केली. शाळा पातळीवर जनजागृती मोहिम राबवावी, तसेच अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाईसाठी विशेष पथक तयार करावे, असे निर्देश त्यांनी दिले.

स्थानिक नागरिकांना अशा पदार्थांच्या विक्रीबाबत माहिती असते, तर पोलिसांना ती कशी मिळत नाही, असा सवाल उपस्थित करत, पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर त्यांनी नाराजी व्यक्त केली.

अशा गुन्हेगारी व्यवसायात गुंतलेल्यांवर कठोर कारवाई करून कायदा-सुव्यवस्था राखावी, असेही यावेळी त्यांनी पोलीस अधीक्षक याना सांगितले आहे.

### जनजागृती मोहिम राबवा

शाळकरी अल्पवयीन युवक अमली पदार्थांच्या नशेच्या आहारी जात आहेत, ही चिंताजनक बाब आहे. असे युवक आढळल्यास त्यांच्या पालकांना माहिती द्या. शाळा-महाविद्यालय पातळीवर जनजागृती मोहिम राबवून नशामुक्त समाज निर्मितीकडे विशेष लक्ष द्या, अशा सूचनाही आमदार किशोर जोरगेवार यांनी दिल्या आहेत.

# तालुक्याचा तहसीलदार कोण ? येवून गेलेला की स्थित असलेला ?



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ११ जानेवारी :** अवैद्य रेती वाहतूक प्रकरणात पकडलेल्या ट्रॅक्टर मालकास दिलेल्या पत्र आणि नोटीस मध्ये या तहसीलचे तहसीलदार राजेश भांडारकर की अनिकेत सोनवणे ?असा संभ्रम नागरिकात निर्माण झाला आहे.

दि.७ जानेवारीला रात्रौ ९ वाजता सुमठाणा येथे वाहतूक करीत असलेले ट्रॅक्टर मंडळ अधिकारी घोडपेठ आणि त्यांच्या पथकाकडून घोट-निंबाळा येथील रोशन रामटेके यांच्या मालकीचे ट्रॅक्टर क्रमांक एमएच ३४ एन ९३३२ तर ट्रॉली क्रमांक एमएच ३४ सीजे ५१२८ असा आहे. या प्रकरणात तहसीलदार राजेश भांडारकर यांनी झालेल्या कारवाईचे सूचना पत्र दि.७ जानेवारीला पत्र क्रमांक २०२५/१७ नुसार ट्रॅक्टर मालक रोशन रामटेके यांस दिले तर नोटीस हा आदल्या दिवशी म्हणजे ६ जानेवारीला घटना घडण्याच्या आधीच कोर्ट विद्यमान अनिकेत सोनवणे तहसीलदार भद्रावती यांचे न्यायालय या पत्रकावर तहसीलदार राजेश भांडारकर यांनी आपल्या स्वाक्षरीने पत्र क्रमांक २०२५/१८ नुसार दिले. या दोन्ही पत्रामुळे नागरिकांना संभ्रम निर्माण झाला. या तहसीलचे तहसीलदार नेमके भांडारकर की सोनवणे?

दिव्यदृष्टी लाभलेले तहसीलदार राजेश भांडारकर घटना घडण्याचे आधीच म्हणजे दि. ७ जानेवारीला अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले असता.दि.६ जानेवारीला म्हणजे एक दिवस आधीच या क्रमांकाचे ट्रॅक्टर,ट्रॅक्टर मालकाचे नाव, पकडण्याचे ठिकाण, कोणत्या मंडळ अधिकारी पकडनार आहे.याची इतंभुत माहिती त्यांना आधी कळलीच कशी, याचा अर्थ तहसीलदार भांडारकर यांना दिव्य दृष्टी प्राप्त झाली असावी असा निघतो.

# स्व.दादासाहेब कन्नमवार जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**भोयगाव, दि. ११ जानेवारी :** महाराष्ट्र राज्याचे दुसरे माजी मुख्यमंत्री स्व.दादासाहेब कन्नमवार यांची १२५ वी जयंती १० जानेवारी रोजी स्थानिक न्यू नरेश सिनेमा नरेश टॉकीज ग़डचांदूर येथे आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमाद्वारे बेलदार समाजातर्फे साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दादासाहेब कन्नमवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजा अर्चना करण्यात आली.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुधाकर गंटावार होते तर प्रमोद बुगावार, लक्ष्मीकांत बाचकवार, नगरसेवक विजय ठाकुरवार,नगरसेवक तथा शिवसेना (UBT)कोरपना तालुकाध्यक्ष सागर ठाकुरवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाला कन्नमवार,राकेश आकुलवार, अंगलीवार,किरण पोगुलवार,अर्चना बाचकवार,पद्मा कन्नमवार,विद्या बुग्गावार,कुसुम संकुलवार,श्रीमती कुसुम आकुलवार इतर बेलदार समाज बांधवांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नैना बाचकवार,माधवी ठाकुरवार, समता आकुलवार,श्रीमती सीमा पोगुलवार, रजत ठाकुरवार,यश ठाकुरवार यांनी परिश्रम घेतले.नैना बाचकवार यांनी आभार व्यक्त केले.

# लोकमान्य टिळक विद्यालय कथा कनिष्ठ महाविद्यालयात सांस्कृतिक उत्साहात

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११ जानेवारी :** येथील लोकमान्य टिळक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालयात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, खरी कमाई, सरस्वती पूजन, वेशभूषा स्पर्धा, वर्ग सजावट इत्यादी विविध विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देणाऱ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



वर्ग पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी श्री लक्ष्मीनारायण मंदिराच्या सभागृहात रंगतदार असा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य प्रकार सादर केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन लोकमान्य टिळक स्मारक मंडळाचे माननीय सचिव गांगेय सराफ यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती एस आर पाटील व सकाळ पाळीच्या पर्यवेक्षिका योगिनी देगमवार उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाचे संचालन गीत पेंदाम व अनुप शंभरकर या विद्यार्थ्यांनी केले. याप्रसंगी सौ. देगमवार लिखित विज्ञान नाटिकेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. सदर कार्यक्रमाला पालकांची भरघोस उपस्थिती होती.वर्ग सजावट, खरी कमाई, कला प्रदर्शन, क्रीडा स्पर्धा व इतर विविध स्पर्धा या कार्यक्रमांना मिडल स्कूल, हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी अद्वितीय असा प्रतिसाद दिला. सिव्हिल लाईन शाखेत उपमुख्याध्यापक प्रफुल्ल राजपुरोहित तसेच पर्यवेक्षक सचिन जहागीरदार यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम व विविध स्पर्धा घेण्यात आल्या. सावित्रीबाई फुले जयंतीदिनी या सर्व स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आली. कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले

# समाज घडविण्यात पत्रकारांची महत्वाची भूमिका - आ. देवराव भोंगळे



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ११ जानेवारी :** विधीमंडळ, न्यायपालिका आणि कार्यपालिका या लोकशाहीतील तिन स्तंभांच्या कार्याकडे लक्ष ठेवत समाजातील वैगुण्यावर बोट ठेवून सकारात्मक दृष्टीने विचार करीत समाजाची निकोप वाढ होण्यासाठी लोकशाहीतील चौथा स्तंभ असलेल्या माध्यमांची महत्वाची जबाबदारी आहे. पत्रकारांनी दिलेल्या योग्य बातम्या आणि विश्लेषणातून माहिती सोबतच समाज घडविण्यात पत्रकारांची महत्वाची भुमिका असल्याचे प्रतिपादन राजुरा येथे पत्रकार दिनी आयोजित पत्रकार दिन सोहळ्यात आमदार देवराव भोंगळे यांनी केले.

अध्यक्षस्थानी जेष्ठ पत्रकार मुरलीमनोहर व्यास होते. उद्घाटन आमदार देवराव भोंगळे यांनी केले. प्रमुख अतिथी माजी आमदार ॲड. वामनराव चटप, माजी आमदार सुभाष धोटे, माजी आमदार सुदर्शन निमकर, अविनाश जाधव, सतिश धोटे, व्हॉईस ऑफ मिडिया चे जिल्हाध्यक्ष अनिल बाळसराफ, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. उमाकांत धोटे, पत्रकार संघाचे अध्यक्ष बि.यु.बोर्डेवार, असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकृष्ण गोरे उपस्थित होते.

राजुरा तालुका पत्रकार संघ व राजुरा पत्रकार असोसिएशन यांनी संयुक्तरित्या पत्रकार दिनाचा कार्यक्रम ६ जानेवारीला छत्रपती शिवाजी महाराज संकुल येथे आयोजित केला.

यावेळी महियर गुंडेविया पुरस्कार विनायक देशमुख, शंकरराव देशमुख पुरस्कार टीव्ही ९ चे निलेश डहाट, प्रभाकरराव मामुलकर पुरस्कार रंगराव कुळसंगे, राघवेंद्रराव देशकर पुरस्कार बि.यु.बोर्डेवार, सुरेंद्र डोहे पुरस्कार बाबा बेग, सरस्वती बोर्डेवार पुरस्कार राधा आत्राम यांना प्रदान करण्यात आला. याशिवाय सत्कारमूर्ती एबीपी माझा चे सारंग पांडे, फारूख शेख, मंगेश श्रीराम, सैय्यद जाहिर, मंगेश बोरकुटे, साहिल सोळंके या पत्रकारांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक श्रीकृष्ण गोरे, संचालन एजाज अहमद व आनंद चलाख आभारप्रदर्शन प्रफुल्ल शेंडे यांनी केले.

## बीटस्तरीय क्रीडा स्पर्धेत चोरगाव शाळेला जनरल चॅम्पियन शिल्ड

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११जानेवारी :** पद्मापूर बीटाच्या बीतस्तरीय शालेय बालक्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा विद्यानिकेतन हायस्कूल उर्जानगर येथे ९ जानेवारीला पार पडल्या यामध्ये खेळ व सांस्कृतिक च्या सर्व प्रकारात सहभागी होत प्राविण्य मिळविल्यामुळे जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा चोरगाव शाळेला जनरल चॅम्पियन शिल्ड प्राप्त झाले. प्राथमिक माध्यमिक मुलामुलींची कब्बडी, खो खो, रिले रेस, वैयक्तिक दौड, दर्शनीय कवायत तसेच सांस्कृतिक मधील सर्वच प्रकारात शाळेने सहभाग घेतला.

# चिमूर तालुक्यातील गाव खेड्यांमध्ये माकडांचा धुमाकूळ, वन विभाग झोपेत

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ११ जानेवारी :** चिमूर तालुक्यातील चिमुर नेरी व सर्व गाव खेड्यांमध्ये बंदरांचा धुमाकूळ सुरू आहे.त्यामुळे नागरिक कमालीचे त्रस्त झाले आहे. या बंदरांचा वन विभागाने बंदोबस्त करावा अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.



या गंभीर समस्येकडे मात्र कोणाचेही लक्ष नाही विशेष म्हणजे या संबंधीत वन विभाग डोळे असुन आंधळ्याची भुमिका का घेत आहे हे कळायला मार्ग नाही लोकांनी या बंदरांचा उपदव्याप सहन करीत बसावे आणि वन विभागाने मजा पाहत राहावे का ?असे अनेक प्रश्न उपस्थित होतात

हे वानर वाहनचालकांना ढकलणे, ठेवलेल्या वाहनांना धडक मारून पळणे, महिलांना चावा घेण्याचा प्रयत्न करणे, उन्हात वाळू टाकलेल्या धान्याची नासधुस करणे, परसबागेतील, बगीच्यातील वृक्षांची, फुल झाडांची, कौलारू घरांवर उच्छाद मांडून नासधुस व फळझाडांची फुलांची आंब्याची मोहोर ,तसेच झाडांना लागलेले आंब्याची मोठ्या प्रमाणात नुकसान करने अशा प्रकारचा या बंदरांचा कहर कित्येक वर्षापासून सुरू आहे.

या समस्येकडे कोणीही लक्ष देत नाही. जनता वनविभागावर रोष व्यक्त करीत आहे तरीही संबंधित विभाग मुंग गीळुन चुप्पी साधुन का बसले आहे असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## खांबाडा येथे नाट्यप्रयोग

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ११ जानेवारी :** चिमूर तालुक्यातील खांबाडा येथे गुरूदेव रंगभुमी वडसा प्रस्तुत खास गोदेंडा गुंफा यात्रेनिमित्य व मॉ मानीकादेवी मंदीर बांधकामाकरीता नवचैतन्य नाट्य रंगभुमी खांबाडा यांच्या सौजन्याने व्ही दीलीपकुमार लीखीत ग्राम पंचायतच्या आवारात १३ जानेवारीला ' माऊली ' या नाटकाचे आयोजन केले आहे.

या नाटकाचे उद्धघाटक डॉ.रमेश कुमार गजभे व अध्यक्ष म्हणुन आमदारकीर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया विशेष अतीथी डॉ.गोपीचंद गजभे काजल नन्नावरे सरपंच , व अन्य पाहुणे मंडळी उपस्थीत असणार आहेत .

या नाटकातील कलावंत गोपी रंदये , राज मराठे , कल्लु शींगरे, महेंद्र भीमटे , मीस तेजस्वीनी खोब्रागडे , शुभांगी राऊत या कलावंताचा संच असणार आहे. नाट्यरसीकांनी या नाटकाचा आस्वाद घ्यावा असे आवाहन नाट्य मंडळानी केले आहे.

# चांदा पब्लिक स्कूल येथील पूर्व प्राथमिक विभागात 'स्पोर्टस फिएस्टा २के २४-२५' चे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ११जानेवारी :** विद्यार्थी जीवनात मानसिक विकासासोबतच शारिरीक विकास होणे गरजेचे असते आणि तो विकास फक्त आणि फक्त मैदानी खेळ खेळल्यानेच होत असतो. म्हणूनच असे म्हणतात की स्वस्थ शरीरातच स्वस्थ मनाचा विकास होत असतो. हाच उद्देश लक्षात घेता चांदा पब्लिक स्कूल येथील पूर्व प्राथमिक विभागात 'स्पोर्टस फिएस्टा २के२४-२५' चे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित प्रमुख अध्यक्ष माध्यमिक एज्युकेशन ऑफीसर राजेश पटले तसेच पाहुणे सायबर सिक्युरिटी एक्सपर्ट मुजावर अली, जनरल सर्जन अशोक भुक्ते, शाळेच्या संचालिका श्रीमती स्मिता संजय जिवतोडे, प्राचार्या आम्रपाली पडोळे, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख शिल्पा खांडरे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहन व राष्ट्रीय खेळाडूंच्या हस्ते मशाल पेटवून करण्यात आली. वर्ग १ली व २री च्या विद्यार्थ्यांनी पालक व उपस्थित पाहूण्यांच्या स्वागताहर्त गीत प्रस्तुत करीत विविध खेळांचे प्रदर्शन दाखविणारे नृत्य सादर करुन विद्यार्थ्यांना व पालकांना खेळण्यास प्रवृत्त केले.

उपस्थित प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्त्व पटवून दिले व मैदानी खेळ खेळले पाहिजे असे वक्तव्य केले. शाळेच्या संचालिका श्रीमती स्मिता संजय जिवतोडे यांनी आपल्या वक्तव्यात आज जर आपण आपल्या मुलांना वेळ दिला तरच मुलं मोठे झाल्यावर आपल्याला वेळ देतील असे पालकांना समजावून सांगितले. शाळेच्या प्राचार्या आम्रपाली पडोळे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देवून खेळात विजयाच्या वेळी उत्साह असावा व पराभव झाला तर निराश होण्याऐवजी पुन्हा प्रयत्न करण्याची जिद्द असावी त्यासाठी सतत खेळाचा सराव करायला हवा असे वक्तव्य केले.

अतिथींच्या हस्ते क्रिडांगणाची विधिवत पूजा करून मुख्य कार्यक्रमाची म्हणजेच 'स्पोर्ट फिएस्टा' ची सुरुवात करण्यात आली. यामध्ये क्रिडा शिक्षकांनी स्कूल चले हम, कलर ब्रेन, बॉटनी ब्लास्ट, टॅन्गराम ट्वीस्ट इ. खेळांचे आयोजन केले व या खेळामध्ये विद्यार्थ्यांसोबत, पालकांनी उत्साहाने सहभागी होऊन खेळांचा आनंद घेतला. विजेत्या विद्यार्थ्यांना विविध पारीतोषीके देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिक्षिका सौ. निलिमा पाऊनकर व विद्यार्थी दिविजा गुप्ता, द्रोणिका बजाज व प्राणहिता पियुषा अविनाश यांनी तर आभार प्रदर्शन पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख सौ. शिल्पा खांडरे यांनी केले. स्पर्धेचे विवेचन शिक्षिका मनिषा नागोशे व श्वेता मच्छा यांनी केले. आयोजनासाठी क्रिडा शिक्षक विनोद निखाडे, प्रणोती चौधरी, अमर कडपेवाले, रमेश कोडारी, जयंती मड्डेला वर्गशिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## मुख्याध्यापिका सुनीता खोब्रागडे यांना साने गुरुजी सामाजिक चेतना पुरस्कार



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. ११ जानेवारी :** अनुसूचित जाती मुलींची निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता खोब्रागडे यांनी केलेल्या शैक्षणिक कार्यासाठी राष्ट्र सेवा दल,वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानतर्फे साने गुरुजी सामाजिक चेतना पुरस्कार प्रदान करण्यात आला.सन्मानचिन्ह,शाल आणि पुस्तक देऊन खोब्रागडे यांना सन्मानित करण्यात आले.अनुसूचित जाती आणि नवबौध्द मुलींची शासकीय निवासी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता खोब्रागडे यांचे नेतृत्वात विद्यार्थीनींची शैक्षणिक, क्रीडा,सांस्कृतिक क्षेत्रात यशस्वी वाटचाल सुरु आहे.सुनीता खोब्रागडे यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्यासाठी त्यांना साने गुरुजी सामाजिक चेतना पुरस्कार देण्यात आला.

वामनराव पाटील स्मृती प्रतिष्ठानचे सचिव तथा राष्ट्र सेवा दलाचे दल मंडळ सदस्य सुरेश डांगे यांचे हस्ते खोब्रागडे यांना पुरस्कार देण्यात आला. याप्रसंगी मनोज राऊत,प्रियानंद गेडाम,ऋषिकेश मोटघरे, शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

## ब्रम्हपुरीत सातवी बौद्ध धम्म परिषद

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. ११ जानेवारी:** धम्माचा विचार व प्रसार करण्यासाठी ब्रम्हपुरी येथे १२ जानेवारी २०२५ रोजी रविवारला बौद्ध धम्म परिषदचे आयोजित करण्यात आले आहे. अशी माहिती बौद्ध धम्म प्रचारक गुणवंत डोर्लीकर यांनी दि.९ जानेवारी रोजी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

प्रमुख उपस्थिती अखिल भारतीय भिक्खू महासंघ व बुद्ध गया महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समितीचे अध्यक्ष प. पूज्य भदंत आनंद महाथेरो, दिल्ली ( ऊ.प्र ) चे,प.पूज्य भदंत सत्यानंद महाथेरो, धम्मप्रकाश विपश्यना केंद्र, येनाडाचे प. पूज्य भदंत भागीरथ महाथेरो, कोटरी अरण्यवास बुद्ध विहार, जि. गडचिरोली प. पूज्य भदंत अभय नायक महाथेरो,यांचे सोबत नागपूर भिक्खू संघ उपस्थित राहणार असून सत्कारमूर्ती आमदार विजय वडेट्टीवार,तर कुलसचिव गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथील डॉ. अनिल हिरेखण राहणार असून कार्यक्रमाचे उदघाटक मनोज काळबांडे, ( अनाथ पिंडक ) कळमेश्वर नागपूरचे मार्गदर्शक पी. एस. खोब्रागडे नागपूर, दुसरे सत्कारमूर्ती वयाच्या ६४ व्या वर्षी पी.एच.डी. मेरिट प्रा.डॉ. राजकुमार शेंडे



ब्रम्हपुरी, एड. रामभाऊ मेश्राम गडचिरोली, त्याच बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्था ब्रम्हपुरी येथील सचिव प्राचार्य देवेश कांबळे, प्रा. भाग्यवान खोब्रागडे शिक्षण संस्था आरमोरी, डॉ. इंद्रजीत नागदेवते गडचिरोली, अशोक रामटेके ब्रम्हपुरी,सुशीला भगत आलापल्ली, सोनूताई रामटेके पुणे, व इतर मान्यवर या बौद्ध धम्म परिषदेला मार्गदर्शन करणार आहे. तसेच चंद्रपूर, गडचिरोली, व लाखांदूर,भंडारा जिल्ह्यातील समता सैनिकदलाची भव्यदिव्य महारॅली काढण्यात येणार असून सकाळी ९ वाजता महारॅलीला सुरवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भीम नगर गुजरी वॉर्ड येथे अभीवादन करून ब्रम्हपुरी येथील प्रमुख मार्गाने निघून ती महारॅली संघभूमी पर्यंत खेड रोड मार्गाने धम्म परिषद ठिकाण जानार असल्याची माहिती कार्यक्रमाचे, आयोजक गुणवंत दिनकर डोर्लीकर, ( माजी सामनेर धम्मप्रिय ) यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३

* स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

